# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 09/01/2023 (सोमवार) सकाळ

## विनयभंग करणाऱ्या आरोपीला अटक

**पो.स्टे. उमरेड** :— अंतर्गत ०१ किमी. अंतरावर जिवन विकास चौक उमरेड येथे दिनांक ०२/०१/२०२३ चे १२.०० वा. दरम्यान यातील अल्पवयीन फिर्यादी/पिडीता वय १६ वर्ष व आरोपी नामे— सुरज बापुराव आजबले, वय २१ वर्ष, रा. वडेगाव ता. उमरेड जि. नागपुर यांचे दोन वर्षापासुन बोलणे चालणे सुरू होते. नंतर कॉलेजला उमरेड येथे जाणे—येणे असल्याने आरोपी हा फिर्यादीचे मागे मागे यायचा व ''मी तुझ्यावर प्रेम करतो तु माझ्याशी लग्न कर'' असे म्हणायचा त्याचे हे वागणे फिर्यादीला न पटल्याने ''तुझ्याशी मैत्री ठेवायची नाही'' असे म्हटले असता देखील दि. ०३/१२/२०२२ रोजी दुपारी १४.३० वा. कॉलेजला सुट्टी झाल्यानंतर आरोपी हा पाठीमागे येवुन जिवन विकास चौक उमरेड येथे येवुन ''मी तुझ्यावर प्रेम करतो तु माझ्याशी लग्न कर'' असे म्हटले असता फिर्यादी तिथुन निघुन गेली. दि. ०२/०१/२०२३ चे १२.०० वा. कॉलेजला जात असतांना घटनास्थळी आरोपी — सुरज आजबले हा मागे येवुन ''माझा वाढदिवस तुझ्या सोबत सेलिब्रेट करायचे आहे तु माझ्या सोबत चल'' असे म्हणु लागला तेव्हा फिर्यादीने माझ्या सोबत बोलायचे नाही असे म्हणुन कॉलेजला गेली व घरी जावुन आई वडिलांना सांगितले.

सदर प्रकरणी फिर्यादी/पिडीता यांचे रिपोर्टवरुन पोलीस स्टेशन उमरेड येथे आरोपीविरूद्ध कलम ३५४ डी, ५०६ भादंवी, सहकलम १२ बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास महिला सहायक पोलीस निरीक्षक शितल खोब्रागडे मो. क्र. ८३०८०८२०९४ या करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**